# भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे बदलते स्वरूप

**प्रा. तक्षशील एन. सुटे**
*आनंद निकेतन महाविद्यालय*
*आनंदवन, वरोरा*

***सारांश –***
*साम्राज्यवाद, वसाहतवाद, फॅसिस्टवाद, वंशवाद व दडपशाही धोरणाला विरोध करून स्वतंत्र भारताने अलिप्ततावाद व शांततावाद धोरण स्विकारले. पण अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता नव्हे. तर जागतिक राजकारणातील होत असलेले बदल व परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या परराष्टीय धोरणांची अंमलबजावणी केलेली दिसून येते. त्यामुळे मोठया राज्यांच्या लष्करी गटात सामिल न होताही शितयुध्दोत्तर काळात जागतिक संतुलन राखून आपले राष्ट्रहित सुरक्षित ठेवण्यास भारत यशस्वी ठरला. सध्या काळात ' ोजारील राष्ट्रांवर चीनचा वाढता प्रभाव आणि अमेरिकेची अफगाणिस्तान मधून माघार अशा स्थितीत भारताने जगात शांती व संतुलन राखण्याच्या दृष्टीने 'क्वाड' संघटनेच्या माध्यमातून भारताने सक्रिय भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. त्यासाठी लुक ईस्ट धोरणापेक्षा ॲक्ट ईस्ट धोरणाला गती दयावी लागेल.*

**प्रस्तावना –**
स्वातंत्र्यापुर्वी साधारणतः 150 वर्षे भारत ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात होता. त्यापुर्वीही अनेक शतके राजा महाराजा किंवा परकीय सत्तांची गुलामगिरी असल्याने एकसंघ भारताचे कोणतेही परराष्ट्रीय धोरण दिसून येत नाही. 1947 ला भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे स्वतंत्र व सार्वभौम संविधान बनले. संविधानाच्या 51 च्या कलमात मार्गदर्शक तत्वाअंतर्गत परराष्ट्रीय धोरणाचा उल्लेख करण्यात आला. ''जगाच्या पाठीवर कदाचित भारत हा एकमेव असा देश आहे की, ज्याची राज्यघटना परराष्ट्र धोरणाचे मार्गदर्शक तत्वे सांगते.'' मायकल ब्रेशर यांच्या मते, पं. नेहरू हे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे शिल्पकार आहेत. म. गांधीसुध्दा पं. नेहरूना परराष्ट्रीय धोरणासंबंधी गुरू मानत होते. म्हणूनच भारताच्या परराष्ट्र धोरणावर नेहरूंच्या कल्पना तत्वे, विचार, आकांक्षा, उद्दिष्टये व ईच्छा ई. ची छाप पडलेली दिसते.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख तत्वे –**
परराष्टीय धोरण हे केवळ भावनांवर, आदर्शवादी मूल्यांवर आधारलेले नसते. तर राष्ट्रीय हित संबंध आणि सुरक्षा हा आधारस्तंभ असतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा सुध्दा राष्ट्रीय हित हाच मुख्य आधार आहे. भौगोलिक स्थान, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन स्वतंत्र भारताने परराष्ट्रीय धोरण स्विकारले. दुसरे महायुध्द संपले होते. आणि लोकशाहिकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती तर दुसऱ्या बाजूने अमेरिका व साम्यवादी रशिया महासत्ता म्हणून उदयास आला. दोन्ही राज्यांनी आपआपल्या औद्योगिक, आर्थिक, लष्करी सामर्थ्याचा उपयोग करून जगातल्या इतर राज्यांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. जगाची विभागणी दोन महासत्तांमध्ये होत गेली. ही आंतरराष्टीय राजकारणाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन भारताने परराष्ट्रीय धोरण निश्चित करताना आलिप्तवाद, शांततावाद, सामाज्यवाद निषेध, इतर सार्वभौम राज्यांचा आदर इत्यादी महत्वाच्या तत्वांना स्विकारले. म्हणूनच ''जगातल्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याला पाठिंबा आणि जगातील राष्ट्र स्वतंत्र होऊ नयेत यासाठी प्रयत्न करणाऱ्या जेवढया साम्राज्यवादी शक्ती आहेत, त्या साम्राज्यवादी शक्तींचा विरोध ही भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची कोनशिला आहे.''

**अपरिहार्य धोरण –**
दुसऱ्या महायुध्दानंतर भांडवलशाही नेतृत्व हे इंग्लंडकडून अमेरिकेकडे गेले. साम्राज्यवादाचा विचार सुध्दा इंग्लंडकडून अमेरिकेकडे हस्तांतरीत झाला. नेहरू सरकार हे अमेरिकन साम्राज्यवादयांचे बाहुले सरकार आहे, ते पाडले पाहिजे असे साम्यवादी सोव्हिएट रशियाचे म्हणणे होते. त्यामुळे रशियाकडे भारताला जाण्यास मार्ग नाही. तर अमेरिकेचे म्हणणे असे की, ''आम्ही भारताला शस्त्रास्त्र देऊ पण किमान आवश्यक असेल तेवढे, पण भारतासाठी लढाई लढणार नाही अन्न देऊ पण खत, औषधी व टॅक्टरचे कारखाने देणार नाही. त्यामुळे हित व सुरक्षा दृष्टीने भारताला अमेरिकेचेही पूर्ण सहकार्य नाही. अशावेळी तत्कालीन काळात अमेरिका वा सोव्हिएट रशिया या दोन्ही गटात जायला रस्ताच नाही. म्हणून अलिप्त राहण्यासाठी पर्याय नाही.

**अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे –**
''अलिप्ततावाद म्हणजे केवळ लष्करी गट वा विचारसरणी यापासून दूर राहणे नव्हे तर प्रत्येक मुद्दा योग्यतेनुसार, ठरविणे, एखादी गोष्ट चूक कि बरोबर ठरविणे आणि त्यानंतर सत्याच्या बाजूने उभे राहण्याचे स्वातंत्र.''
नेहरूंच्या मते, ''जोपर्यंत फॅसिस्टवाद, वसाहतवाद, वर्णद्वेश आणि दडपशाही अशा वाईट प्रवृत्ती आहेत तोपर्यंत त्यांच्या विरोधात आम्ही खंबीरपणे व निसंदिग्धपणे उभे ठाकू.'' नवीन स्वतंत्र होणाऱ्या आशिया–आफ्रिका देशांना जोरजबरदस्तीने ल" करी गटात सामिल करण्यासंबंधी हरकत घेऊ. नेहरूंनी असेही स्पष्ट केले की,''जेथे स्वातंत्र्याला धोका असेल किंवा न्याय हिरावला गेला असेल किंवा आक्रमण घडले असेल तेथे आम्ही तटस्थ राहणार नाही.'' म्हणूनच सुवेझ कालवा प्रश्न, कोरियन युध्द, पाकिस्तान–बांग्लादेश संघर्ष, श्रीलंकेतील आंतरिक संघर्ष इ. प्रसंगी भारताने पुढाकार घेऊन महत्वाची भूमिका पार पाडलेली दिसून

येते. अलिप्तवाद व शांततावादाची व्यापक व काळसंगत भूमिका भारताने निभवलेली दिसून येते. जागतिक परिस्थिती व बदल या आधारे भारताने त्या–त्या वेळी भूमिका घेतेलेली आहे. म्हणूनच सुरूवातीला अलिप्तवाद, शांततावाद, पंचशील, साम्राज्यवाद–विस्तारवादाला विरोध इ. तत्व स्वीकारले तरी काही वर्षात भारत–चीन संबंधात कटुता निर्माण झाल्याने आणि भांडवलशाही गटाने पाकिस्तानला लष्करी मदत पुरविण्यास सुरूवात केल्याने भारताने आपल्या धोरणात फेरबदल केला. राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन, गटनिरपेक्षतेचा त्याग न करता सोव्हिएट रशियाशी मैत्रिपूर्ण संबंध बळकट करण्यावर भर दिला. 1971 मध्ये भारताने रशियाशी 20 वर्षाचा मैत्रीपूर्ण करार केला. पुढे सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्याने अमेरिका आणि इतर प्रगत भांडवलशाही देशांशी संबंध बांधणी करण्यास सुरूवात केली. सोबतच शीतयुध्दांतर काळात परराष्ट्रीय धोरणाला समतोल करण्यासाठी दक्षिणपुर्व आशिया, आफ्रिका तसेच लॅटीन अमेरिकन देशापर्यंत पोहचण्याच्या प्रयत्नांना गती दिली.

**बहुधृवीय जगाच्या उदयासाठी भूमिका –**

बहुधृवीय जगाच्या उदयासाठी भारताने ब्राझील, रशिया, चीन व दक्षिण आफ्रिका या देशांसोबत हात मिळवणी करून 'ब्रीक्स' ची स्थापना केली. देशातील आर्थिक धोरणाला अधिक सुसंवादी बनविण्यासाठी भारत जी –20 मध्ये सहभागी झाला. त्यामुळे नवीन काळात ब्रीक्स आणि जी – 20 ही भारतीय परराष्ट्रीय धोरणाची महत्वाची साधने बनलेली आहेत. विकसित व विकसनशिल देशांशी प्रस्थापित करण्याबरोबरच भौगोलिक समिपता लक्षात घेऊन भारताने शेजारील राज्यांसोबत सुध्दा संबंध सृदृढ करण्यावर भर दिला. 1985 मध्ये दक्षिण आशियाई राज्यांसोबत 'सार्क' ची स्थापना केली. दक्षिण आशियामध्ये भारताचे स्थान मध्यवर्ती आहे. त्यामुळे सार्कच्या यशा–अपयशाच भारताची मोठी जबाबदारी आहे. सार्कच्या अनेक योजनांमध्ये भारताने उदार भूमिका घेत निर्णय प्रक्रिया सुकर होण्यास हातभार लावला आहे. अंतर्गत अशांतता, परस्पर अविश्वास असूनसुध्दा सार्क देश आजही एकत्रित आहेत. आणि सार्क संघटना टिकूण आहे, हेच सार्कचे मोठे यश आहे. ''फार क्रांन्तिकारक यश सार्कला मिळाले नसले तरी परिस्थिती लक्षात घेता हे मर्यादित यश सुध्दा लक्षणीय आहे.'' सर्व सार्क सदस्यांना याची जाणीव आहे की, आपण एकत्रित राहीलो तरच टिकून राहू अन्यथा एकएकटे नष्ट होऊ. त्यामुळे परस्पर सहकार्यता या धोरणाला अधिक मजबूत करण्यास वाव देणे गरजेचे आहे. आणि भारत त्यासाठी नेहमीच सक्रिय राहीलेला आहे. 'दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र' आणि दक्षिण आशियाई देशात अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी 2006 मध्ये 'साप्टा करार' झाला. दक्षिण आशियाई देशांमध्ये भारत क्षेत्रफळाच्या दृष्टीनेच मोठा आहे असे नाही तर अर्थव्यवस्थेलाही मजबूत करण्यासाठी भारताने मोठे मन करून 70% भागिदारी केलेली दिसून येते. कोवीड 19 चे संकट दूर करण्यासाठी 'इमरजन्सी फंड' स्थापन करण्याची सुचना भारताने केली. यासाठी 10 मिलियन डॉलर देण्याची घोषणासुध्दा भारताकडून करण्यात आली. अनेक देशांना कोवीड लसीकरणाचा पुरवठा करून आपले उदारमन सिध्द केले.

असे असले तरी, भारत–पाकिस्तान तणावाचे संबंध ही प्रामुख्याने सार्कची डोकेदुखी आहे. दोन्ही देश आता अणु–तंत्रज्ञानात संपन्न आहेत. मोठया राज्यांची मदत मिळविण्यात यशस्वी होतात. त्यामुळे भारत–पाक सीमेवर चकमकी होणे, आंतकवादी हल्ले होणे, काश्मिर मुद्दा वारंवार उकरून काढणे असे प्रकार पाकिस्तानकडून होत असतात. पण भारताने नेहमी संयमी भूमिका घेऊन चर्चेतून मार्ग काढण्यावर भर दिला. भारत–पाक चा द्विपक्षीय प्रश्न सार्कच्या आड येणार नाही हा भारताचा नेहमीच प्रयत्न राहीलेला आहे.

विशेष म्हणजे अलीकडच्या काळात दक्षिण आशियाई देशांमध्ये चीनचा वाढता प्रभाव भारतीय परराष्ट्रीय धोरणाला सतावणारा आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये चीन च्या 'साफ्ट पॉवर डिप्लोमसी' मध्ये 'ठत्
परियोजना' सर्वात महत्वपूर्ण कडी आहे. या परियोजनेच्या माध्यमातून चीन दक्षिण आशियाई देशांमध्ये एक व्यापक नेटवर्क निर्माण करीत आहे. भूमी व सागरी मार्ग तयार करून आफ्रिका आणि युरोप ला जोडण्याचा प्रयत्न करीत आहे. BRI मुळे बिना रोक–टोक नी व्यापार आणि वित्तीय व्यवहार जाळे पसरवून दक्षिण आशियाई देशांमध्ये आपले पाय घट्ट करून नियंत्रण मिळवित आहे. त्यासाठी चीन मोठी आर्थिक गुंतवणूक करून शेजारील देशांना आकर्षित करीत आहे. स्वाभाविकच दक्षिण आशियाई देशांचेही चीन प्रति आकर्षन वाढत आहे. त्यामुळे 2014 च्या पंतप्रधान शपथविधी सोहळयात शेजारील राष्ट्रांच्या उपस्थिती व आदार–सत्कारामुळे सुध्दा फारसा फरक पडला नाही. चीन च्या साफ्ट पॉवर डिप्लोमसी व BRI धोरणामुळे शेजारील राष्ट्रांमध्ये परियोजनांचे जाळे विणल्या गेले. चीनच्या या ऋणी अर्थव्यवस्थेतून बाहेर पडणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. दुसऱ्या बाजूने भारत–चीन सीमावाद व सैनिक झडपा–झडपी वरून असेही लक्षात येते की, चीन वेळप्रसंगी साफ्ट पॉवर डिप्लोमसी ऐवजी 'हार्ड पॉवर' चा सुध्दा वापर करू शकतो. डोकलाम वाद' गलवान घाटी वाद इत्यादी ताजी उदाहरणे आहेत.

**समारोप –**

जागतिक राजकारणात निर्माण झालेले वातावरण, चीनचा वाढता प्रभाव, अमेरिकेची अफगाणिस्तानातून माघार अशा परिस्थितीत भारताने आपल्या तात्विक धोरणाला मूरड घालून कुटनीतिक राजकारणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. 2007 मध्ये स्थापन झालेल्या 'क्वाड' ला अधिक क्रियाशिल करणे गरजेचे आहे.'क्वाड' हे चतुर्पक्षीय सुरक्षा संवाद साधण्यासाठी तसेच आशिया आणि प्रशांत महासागरात शांती व संतुलन घडवून आणण्यासाठी तयार केलेले संगठन आहे. अर्थात, भारत त्या दिशेने

सक्रिय पावले टाकताना दिसतो, यात दुमत नाही. 24 ऑक्टोबर 2021 ला अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये क्वाड नेत्यांच संमेलनाचे आयोजन केल जाणार आहे. व्हाईट हाऊसच्या प्रसिध्दी पत्रकात म्हटलंय की,''क्वाड नेत्यांच्या चर्चेचा भर देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी, तसंच हवामान बदल, तंत्रज्ञान, सायबर स्पेस सारख्या गो" टींवर असेल.'' सोबतच भारत–प्रशांत क्षेत्रावरही या संमेलनात चर्चा होणार आहे. क्वाड च्या या भूमिकेमुळे चीनची चिंता वाढलेली दिसून येते. म्हणूनच चीन क्वाडवर उघड टीका करीत आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते हुआ चुनयिंग यांनी एका पत्रकाद्वारे असे म्हटले की, ''आपण सगळे जाणतो की क्वाड कशापध्दतीचा गट आहे. एक वेगळा गट बनवण्याचा, चीनला आव्हान देण्याच्या, शेजारील राष्ट्रांसोबत चीनच भांडण लावण्याच्या प्रयत्नांचा चीन विरोध करीत आहे.'' ते असेही म्हणाले की, क्वाड नाटो सारखा गट आहे.'' याचा असाच अर्थ होतो की, क्वाड च्या सक्रियतेमुळे चीन फार चिंतेत पडलेला दिसतो. अर्थात, क्वाड संबंधी चीनने दिलेल्या प्रतिक्रियेचे उत्तर क्वाड सदस्य राज्यांनी दिले. तरीही चीनला प्रभावहीन करण्यासाठी, जागतीक संतुलन राखण्यासाठी क्वाड ची सक्रियता आवश्यक आहे. शेजारील राज्यांच्या भावनांना हात घालून 'लुक ईस्ट पॉलिसीपेक्षा ॲक्ट ईस्ट' धोरण भारताने पुढे आणावे व आर्थिक स्लोडाऊन थांबवून अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर भर देणे गरजेचे आहे. त्याशिवाय बार्गेनिंग करता येणार नाही. तसेच भारतातील लोकतांत्रिक व्यवस्था अधिक विकसित करण्यावर सुध्दा भर दिला पाहिजे.

**<u>संदर्भ</u>** –

1. *प्रा. जॉन्सन बोर्जेस (संपा.), 'सयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संबंध' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे 2011*
2. *चिंतामणी भिडे (संपा.), समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारण' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे – 2019*
3. *डॉ. शैलेंद्र देवळणकर, 'भारताचे परराष्ट्रीय धोरणः सातत्य आणि स्थित्यंतरे' प्रकाशक – सकाळ पेपर्स प्रा. लि. पुणे 2016*
4. *मनीषा टिळेकर, 'भारत आणि भारताचे शेजारी' साधना प्रकाशन पुणे 2011*
5. *www.orfonline .org*
6. *www.bbc.com*
7. *महाराष्ट्र टाईम्स (15 ऑगस्ट 2021)*